**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.२६/२०१८**
**वादीतर्फे साक्षीदार क्र.१**
**नि.क्र.५९ लगत**

**(दि.०७.०१.२०२५ रोजीचा उर्वरित उलटतपास पुढे सुरु)**

**वादीतर्फे सा.क्र.१ चा उर्वरित उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.बी.विधाते यांचेमार्फत सुरु–**

हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकत नं.५३३ चा जुना मिळकत नं.१३३ होता. हे म्हणणे खरे नाही की, मिळकत नं.१३३ च्या अगोदर त्याचा मिळकत नं.१११ होता. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.३ सोबत अ.क्र.६ ला मी मोजणीच्या नकाशाची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. सदरची झेरॉक्स प्रत प्रतिवादी क्र.१ यांना मान्य आहे असे विधीज्ञांनी नमुद केल्याने सदर प्रतिस **नि.क्र. ८९** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.८९ मध्ये दाखवलेले घर हे प्रतिवादी क्र.१ चे आहे. साक्षीदार सांगतो की, तो गुरांचा गोठा आहे. आता मला नि.क्र.३/७ ला दाखल करण्यात आलेला फोटो दाखवला. तो फोटो मी च दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांच्या विधीज्ञांना सदरचा फोटो मान्य आहे असे नमुद केल्यामुळे सदर फोटोस **नि.क्र.९०** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.९० मध्ये जे बांधकाम चालू आहे ते प्रतिवादी क्र.१ चे आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.९० मध्ये डाव्या बाजूला जी घरे दिसत आहेत ती सपकाळ यांची घरे आहेत व ती पूर्वेस आहेत. नि.क्र.९० मध्ये उजव्या बाजूला दिसणारे घर हे सुरेश ग्यानबा तरडे यांचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, पूर्वेच्या बाजूला सपकाळाचे घर पश्चिमेला सुरेश ग्यानबा तरडे यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.९० मध्ये दिसणारे विटा, वाळू, खडी हे प्रतिवादी क्र.१ याच्या बांधकामाचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, उत्तर बाजूच्या रस्त्यावरुन दक्षिणेकडील जागेचा फोटो काढलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, खडी, वाळू पडलेल्या जागेत मी नि.क्र.५ चा अर्ज मंजूर झाल्यानंतर शेड बांधलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५ चा अर्ज मंजूर झाल्यानंतर न्यायालयात आम्ही पोलिस बंदोबस्तासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी आम्हाला बंदोबस्त मंजूर केला होता त्यामुळे ते आले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी बामणोली ग्रामपंचायतला पत्र दिले होते की, मला पोलिस बंदोबस्त मंजूर झालेला आहे व तुम्ही दि.०५.०९.२०२४ रोजी हजर रहा. आता मला नि.क्र. ७०/३ लगतेच एकूण ६ फोटो दाखवण्यात आले. हे

म्हणणे खरे नाही की, सदरचे फोटो हे दि.०५.०९.२०२४ रोजीच्या कारवाईच्या वेळेचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.७०/३ लगतच्या फोटोमधील शेड हे पोलिस कारवाई झाल्यानंतर व कब्जा घेतल्यानंतर बांधून घेतलेले आहे. सदर फोटोमध्ये दिसत असणारे पत्रा ठोकण्यासाठीचे पोल हे पोलिस कारवाई करताना रोवलेले आहेत. सदर फोटोंमधील बाबी या साक्षीदाराने मान्य केलेल्या असल्यामुळे त्यांना निशाणी देण्यात यावी असे प्रतिवादी क्र.१ च्या विधीज्ञांनी नमुद केले. त्यास वादीचे विधीज्ञ यांनी हरकत घेवून नमुद केले की, त्यास ६५ ब च्या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सदर फोटोतील बाबी या साक्षीदार यांनी मान्य केल्यामुळे व सदर फोटो हे खोटे बनवलेले आहेत असा वादीचा बचाव नसल्यामुळे त्यास **नि.क्र. ९१ व ९२** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही माझ्या मालकीची नाही. शंकर भाऊ व राऊ भाऊ हे माझे चुलते आहेत त्यामुळे त्यांची मिळकत ही मला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ यांनी बांधलेल्या घराचा मला हेवा वाटला म्हणून प्रतिवादी क्र.१ ला अडचण व्हावी या उद्देशाने मी सदरचा खोटा दावा दाखल केलेला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

मेढा. (रविंद्र भ. खवले)

दि.२८/०१/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा.